जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 9 MAY 2017
पुढारी

# श्रमाच्या माध्यमातून चारित्र्य घडते : प्रा. नलगे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वप्नपूर्तीसाठी अखंड परिश्रमाची आवश्यकता असते. श्रमाच्या संस्काराशिवाय मनुष्याला थोरपण प्राप्त होत नाही. या तत्त्वाची पायाभरणी शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी शिवाजी विद्यापीठात केली. यासाठी 'कमवा व शिका' ही योजना त्यांनी राबविली. या योजनेतून हजारो चारित्र्यवान व्यक्तिमत्त्व निर्माण झाली. श्रमातून व्यक्तीचे चारित्र्य घडते, असे प्रतिपादन प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी केले.

डॉ.आप्पासाहेब पवार यांच्या १११ व्या जयंती निमित्त आयोजित आजी-माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

यावेळी मनीषा पाटील, पूजा जाधव, पल्लवी मेहता, सुप्रिया खेगडे, नमिता गावडे, रेश्मा बाबर, आसमा सय्यद, रेवणनाथ नवले यांचा सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थी डॉ. सी. एच. भोसले यांचाही आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. बी. एल. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य टी.के. सरगर यांनी केला. आभार डॉ. एस. जे. नाईक यांनी मानले. सूत्रसंचालन वैभव कांबळे व नीता साठे यांनी केले. यावेळी कुलसचिव डॉ.व्ही.डी. नांदवडेकर, डॉ. एस. एन. पठाण, डॉ. जे. जी. जाधव, माजी कामगार आयुक्त अंकुश मोरे, प्राचार्य विठ्ठल लिपारे, प्राचार्य डॉ. मानसिंग जगताप, युवराज कदम, प्रा. किसन कुराडे, प्रा.अनुराधा गुरव, डॉ. संभाजी शिंदे यांच्यासह विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

9 MAY 2017 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आप्पासाहेब पवार यांची शिवाजी विद्यापीठात जयंती साजरी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवर.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती सोमवारी (दि.८) विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ अतिथीगृहासमोरील डॉ. पवार यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्येही मान्यवरांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन येथेही प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या अर्धपुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, डॉ. ए.एम. गुरव, डॉ. जी.बी. कोळेकर, डॉ. पी.व्ही. अनभुले, डॉ. संभाजी शिंदे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, माजी कुलसचिव डॉ. डी.व्ही. मुळे, प्रा. सी.एच. भोसले, प्राचार्य मानसिंगराव जगताप, डॉ. बी.एल. पाटील, डॉ. एस.जे. नाईक, डॉ. संभाजीराव कणसे, प्रा.टी.के. सरगर, डॉ. सी. टी. पवार, अशोक साबळे, अनिल वेल्हाळ आदी उपस्थित होते.